
गांधी शिक्षण संस्था धापेवाडा
ता.कळमेश्वर, जि.नागपूर व्दारा
संचालित



# 'उड़ान'

(2023-2024)



धिमन मल्टिएज्युकेशन कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड् सायंन्स,
ब्राम्हणी ता. कळमेश्वर, जि. नागपूर

Scanned with OKEN Scanner



# थिमन मल्टिएज्युकेशन कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड् सायंन्स,

ब्राम्हणी ता. कळमेश्वर, जि. नागपूर

Scanned with OKEN Scanner

# आमचे आदरणीय



**आमचे प्रेरणास्थान**
**मा. श्री. रमेशजी मानकर**
**संस्थापक (अध्यक्ष) गांधी शिक्षण संस्था धापेवाडा**



**मा. सौ. प्रिया मानकर (पटले)**
**सचिव**
**गांधी शिक्षण संस्था धापेवाडा**



**मा. सौ. अरूणा र. मानकर**
**सदस्या**
**जि. प. सदस्या**

Scanned with OKEN Scanner

# थिमन मल्टिएज्युकेशन कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड सायंन्स, ब्राम्हणी ता. कळमेश्वर, जि. नागपूर

## प्राचार्या



डॉ. कु. मंजुषा एम. निघोट

## (साहा. प्राध्यापक)



कु. स्वाती श्री. वंजारी



कु. पी.व्ही. वाळके



श्री. एन.जी. पटे



श्री. मनोज उगले



श्री. राजेश बी. चौधरी



श्री. पी.डब्लु. वाघधरे



श्री. आकाश राऊत



सौ. स्वाती उमक



सौ. अंजली नागपुरे

Scanned with OKEN Scanner

## थिमन मल्टिएज्युकेशन कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड् सायंन्स, ब्राम्हणी ता. कळमेश्वर, जि. नागपूर

### - संपादक मंडळ -



डॉ. कु. मंजुषा एम. निघोट

**संपादक**



कु. स्वाती श्री. वंजारी

**सहसंपादक**



श्री. मनोज उगले

**संपादक सहाय्यक**



सौ. अंजली नागपुरे

### विद्यार्थी प्रतिनिधी

**हेड गर्ल**



कु. प्राजक्ता घायवट

बी.कॉम. भाग - ३


**हेड बॉय**



श्री. अविनाश वानखेडे

बी.कॉम. भाग - ३

Scanned with OKEN Scanner



या भारतात बंधूभाव नित्य वसू दे, दे वरचि असा दे
हे सर्व पंथ संप्रदाय एक दिसू दे, मतभेद नसू दे
नांदोत सुखे गरीब-अमीर एक मतांनी
मग हिंदू असो ख्रिश्चन वा हो इस्लामी
स्वातंत्र-सुखो या सकमामांजि वसू दे
दे वरची असा दे
सकळास कळो मानवतो, राष्ट्रभावना
हो सर्व स्थळी मिळुनी समुदाय प्रार्थना
उद्‍योगी तरूण शीलवन येथे असू दे
दे वरची असा दे.

जातीभाव दिसरूनिया एक हो आम्ही
अस्पृश्यता समुळ नष्ट हो जगातुनी
खलनिंदका मनीही सत्य न्याय वसू दे
दे वरची असा दे.
सौंदर्य रमो घराघरात स्वार्गीयापरी ही
नष्ट होऊ दे विपत्ती भीती बावरी ह
तुकडयास सदा या सेवेमाजी वसू दे
दे वरची असा दे.

राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज

Scanned with OKEN Scanner

# प्राचार्यांचे मनोगत



भारत देश हा सद्यस्थितीत जगामध्ये युवा देश आहे. अशी परिस्थिती प्रत्येक देशाला, राष्ट्राला एकदातरी येतेच, तशी भारतालाही आज आली आहे. आज भारत देश हा युवा अवस्थेतून जात आहे ही लक्षणीय बाब आहे. तसे भारताने संपूर्ण
जगाचे लक्ष आकर्षित केले आहे. म्हणजे भारताची जास्तीतजास्त लोकसंख्या ही तरूण आहे.

लोकसंख्या तशी जास्तच आहे. अशीच परिस्थिती एकदा जपान या देशाला मिळाली होती. त्याचा त्यांनी संपूर्ण फायदा घेत जगाला आदर्श वाटावा असा उपयोग केला. आपण या परिस्थिचा किती व कसा फायदा घेतो यावर विचार व चिंतनाची गरज आहे.

देशात परिस्थिती खूप वाईट आहे. जी युवाशक्तीला विभक्त आणि छीन्न करण्यासारखी आहे. भारतात वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था, धर्मभेद, वंशभेद, लिंगभेद, मोठ्या प्रमाणात चालत आला आहे. अशाप्रकारे भारतातील लोक जातीत, वर्ण आणि धर्मात विभागल्यामुळे भारतावर इतर लोकांनी सहज आक्रमणे केली आणि भारतावर अनेक वर्ष राज्य केल. आजही भारतात जातिव्यवस्था तशीच टिकून आहे हे नाकारता येत नाही, फक्त त्याचा मार्ग बदलला आहे. त्याचा मोठा गंभीर परिणाम हा भारताच्या विकासावर होत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात जोपर्यंत भारतात जाती वर्णव्यवस्था आहे तोपर्यंत भारताचा सामाजिक, आर्थिक विकास होणार नाही. याची

Scanned with OKEN Scanner

गंभीर दखल आपल्या **धिमन मल्टीएज्युकेशन कामर्स ॲन्ड सायंस** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घेऊन ती संपविण्यासाठी कटिबध्द असले पाहिजे.

विद्यार्थ्यांनो ज्याप्रमाणे मनुष्याला अन्नाची गरज आहे, त्याचप्रमाणे सर्वांना विद्येची आवश्यक आहे. विद्या ही एकाप्रकारची तलवार आहे. ही दुधारी असते. तिने दुष्टांचा संहारही करता येतो व दुष्टांपासून आपले रक्षणही करता येतो. म्हटलेच आहे की -

**स्वदेश पूज्यते राजा ।**
**विव्दान सर्वत्र पूज्यते ।।**

आपण सर्वजन 'विद्या' शिकण्यासाठी आला आहात; पण माझ्यामते केवळ विद्याच पवित्र असु शकत नाही. विद्येबरोबर 'प्रज्ञा' म्हणजे शहाणपणा, 'शील' म्हणजे सदाचरणाने संपन्न असं आचरणं, 'करूणा' म्हणजे सर्व मानव जातिसंबंधी प्रेमभाव आणि 'मैत्री' म्हणजे सर्व प्राणिमात्रांविषयीची आत्मीयता या चार पारमिता असल्या पाहिजेत, तरच विव्दतेचा काही उपयोग आहे. विद्येबरोबरच मानवाजवळ जर करूणा नसली तर तो कसाई आहे असं मी समजतो. करूणा म्हणजे माणसामाणसावरचं प्रेम ! हयाच्यापुढेही मनुष्य गेला पाहिजे व त्याने मैत्री संपादन केली पाहीजे.

विद्या, प्रज्ञा, करूणा, शील या पंचतत्वानुसार धिमन मल्टीएज्युकेशन कॉमर्स ॲन्ड सायंस महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्यांने आपले चारित्र्य बनविले पाहिजे आणि या मार्गाने एकटयानेच जावे लागले तरी मनोधैर्य व निष्ठा राखून गेले पाहिजे.

'उड़ान' या वार्षिकांकात २०२३ - २०२४ अंकाकरिता ज्या विद्यार्थ्यांचे आपले लेख, कविता, दिल्यात त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा व अंकाकरिता सहकार्य करणा-या प्राध्यापक वर्गाचे आभार.

**- डॉ कु. मंजुषा एम. निघोट**

**(कार्यकारी प्राचार्य)**

Scanned with OKEN Scanner

# संपादकीय मनोगत

भवतालचं जे समकालीन वास्तव आहे परंपरेशी जे विधायक नात आहे, त्या समकालीन वास्तवाचा व परंपरेचा विविध अंगानी वेध घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न विद्यार्थ्यांनी साधनातील तुतारी, परख अमृतोदय, A View From The Bridge या अनुक्रमे मराठी, हिन्दी, संस्कृत, इंग्रजी विभागातुन केलेला आहे, केशवसुतांची कविता 'तुतारी' ; जैनेंद्रकुमार जैनेची कादंबरी 'परख' ; गोकुलनाथांच नाटक अमृतोदय, आर्थर मिलरच नाटक A View From The Bridge या प्रतिभावंताच्या कलाकृतींनी विभागांचे नामाभिमान केले आहे. इथे ती शिर्षके केवळ त्या साहित्यीक कृतिपर्यंत मर्यादित न राहता विभागाच्या संदर्भातही प्रसरणशील होणारी आहे.

२०२३ - २०२४ शैक्षणिक वर्षातील महत्वाच्या म्हणजे संस्मरणीय घटना, व्यक्ती, प्रसंग, जन्मशताब्दी व पर्यावरण आधिच्या लेखातून दखल घेतली आहे. सोबतच पत्रकारिकेचं कौशल्य विकसित होण्याच्या दृष्टिने कॉमर्स विभागातून लक्षणीय वार्ता २०२३ - २०२४ प्रकाशित केल्या आहे. कला - वाणिज्य, विज्ञान, चित्रपट, क्रिया, अर्थशास्त्र, संगणकशास्त्र, तत्वज्ञान, इतिहास, विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया इत्यादी दृष्टीनेही साधनात सजगता बाळगली आहे. विविध समितीचा अहवाल म्हणजे विद्यार्थ्यांचा ध्येयाचा व कृतिचा कार्ययज्ञच आहे.

" अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी " । या तुकारामाच्या ओळीप्रमाणे इथवर प्रवास आला आहे. विद्यार्थ्यांच्या उमलत्या प्रतिभेच्या रूपसुंदर व अर्थगर्भ प्रवासाला यश चिंतितो !

संपादक

प्रा. श्री आकाश राऊत

Scanned with OKEN Scanner

# सह संपादकाचे मनोगत

आजचे विद्यार्थी टेक्नोसेव्ही आहेत. स्मार्ट आहेत. नवनवीन मोबाईल फोन सहजतेने हाताळतात. कम्पुटरच्या कि-बोर्ड वर त्यांची बोट चपळतेने फिरतात. गुगल वरून रेफरन्सेस चटकन शोधतात पूर्वी माहिती मिळवायची असेल तर ग्रंथालयात जाव लागायच पुस्तक शोधावी लागायची आता हीच माहिती गुगलवर सहजतेने मिळत असल्याने आजच्या विद्यार्थ्याला शिकताना निव्वळ माहिती देवून चालत नाही, तर ती तर त्यांना असतेच. माहितीच्या पलिकडे जावून शिकविण्याची खरी गरज आहे. त्यामुळे शिक्षकांसमांरील आव्हान वाढले आहे.

उपलब्ध तंत्रज्ञानाच्या साहायाने हवी ती माहिती मिळविण्यासाठी कौशल्यांची अर्थातच गरज असते. ती कौशल्या ज्यांच्याकडे आहेत त्यांना माहितीचा साठा गवसला आहे. असे म्हणता येईल. त्यांचा उपयोग करून ते माहिती संपन्न होवू शकतात. मात्र माहितीचा खजिना खुला होवूनही साधी-साधी माहिती विद्यार्थ्यांनाच आसते असे नाही.

माहितीचा खजाना एका क्लिकवर उपलब्ध झाल्याने माहिती मिळविण्याची भुक आता कमी झाली आहे. विद्यार्थ्यांचा आळस वाढला आहे. परीणामी साधीसोपी वाटणारी माहितीही विद्यार्थ्यांकडे नसते. टी. व्ही. इतर प्रसिध्दी माध्यमे मोबाईल, फोन, सोशल मिडिया आदी मुळे विद्यार्थ्यांच्या बुध्दीला जंग लागत चालला आहे.

म्हणूनच आजच्या तरूण पिढीला बुध्दीला चालना देण्यासाठीच 'उड़ान' प्रसिध्द करित आहेत.

तरूण पिढीला ध्येयवादी व आदर्शवादी बनविण्यासाठी ताकद त्यांच्या इच्छाशक्तीच्या विकासात आहे.

Scanned with OKEN Scanner

परिस्थितावची जाण ठेव.

वडिलधा-यांचा मान ठेव.

विद्यार्थी आहेस तु.

हयाच थोड भान ठेव ।।

शिक्षणाचा ध्यास ठेव

शिक्षणाचा वेड ठेव

स्वप्न त पाहता सारी पण

ती पुरी करण्याची मनामध्ये

थोडी आस ठेव ।।

मनोज उगले

(प्राध्यापक)

Scanned with OKEN Scanner

















Scanned with OKEN Scanner
















Scanned with OKEN Scanner